सुरक्षा रक्षक मंडळामार्फत सुरक्षा रक्षकांच्या वेतनातून राष्ट्रीयकृत बँक, सहकारी बँक व पतसंस्थेच्या कर्जाच्या हप्त्याच्या कपातीबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, उर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र. एसजीए २०१७/प्र.क्र. ८९/कामगार-५
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १८ ऑक्टोंबर, २०१७.

वाचा :- १) शासन निर्णय क्रमांक एसजीए - २०११ / प्र.क्र. २८१३/ कामगार - ५ दि. १७-०३-२०१२
२) शासन शुध्दीपत्रक क्रमाक एसजीए-२०११ / प्र.क्र. २८१३/कामगार- ५ , दि. २९-०१-२०१३

शासन निर्णय :-

सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक यांच्या वेतनातून राष्ट्रीयकृत बँक, सहकारी बँक व पत संस्थेच्या कर्जाच्या हप्त्याची कपात करण्याबाबत संदर्भाधिन शासन निर्णय दिनांक १७/०३/२०१२ व शासन शुध्दीपत्रक दिनांक २९/०१/२०१३ नुसार मार्गदर्शन तत्वे निश्चित करण्यात आले आहे.

तथापी, सुरक्षा रक्षकांच्या व विविध कामगार संघटना तसेच बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा व सुरक्षा रक्षक मंडळाने सेवानिवृत्त व मृत झालेल्या सुरक्षा रक्षकांच्या अंतिम देय रकमेच्या कर्जाची रक्कम व व्याजाची रक्कम त्यांच्या उपदान व भविष्यनिर्वाह निधीमधून करण्याची पध्दत उपदान प्रदान अधिनियम १९७२ व कर्मचारी भविष्य निर्वाह निधी आणि किरकोळ तरतुदी अधिनियम १९५२ यामधील तरतुदीशी विसंगत असल्याचे निदर्शनास आणुन दिले आहे. याबाबत संबंधित अधिनियम व नियम यामधील तरतुदी पाहता मंडळातील नोंदीत सेवानिवृत्त व मृत झालेल्या सुरक्षा रक्षकांच्या अंतिम देय रकमेच्या कर्जाची रक्कम व व्याजाची रक्कम त्यांच्या उपदान व भविष्यनिर्वाह निधीमधून करण्यासंदर्भातील तरतुद वगळण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार दिनांक १८/०३/२०१२ रोजीच्या शासन निर्णय मधील परिच्छेद क्र. (I) मधील "**ग.**" " सेवानिवृत्त झालेल्या सुरक्षा रक्षकांच्या अंतिम देय रक्कमेच्या कर्जाची व व्याजाची रक्कम कपात करण्याची पध्दती पूर्वीप्रमाणे असावी**.**"

या ऐवजी,

"सेवानिवृत्ती व मृत झालेल्या सुरक्षा रक्षकांच्या अंतिम देय रकमेच्या कर्जाची व व्याजाची रक्कम त्यांच्या भविष्य निर्वाह निधी किंवा उपदान निधीमधून कपात करता येणार नाही " असे वाचण्यात यावे.

सदर शासन निर्णयातील इतर मार्गदर्शक तत्वे तशीच कायम राहतील.

सदर शासन निर्णय विधी व न्याय विभागाच्या अनुपौचारीक संदर्भ क्र. ३१८/७१९/ Civil/ Confl/ 'A' Br. दि. ०७/०९/२०१७ अन्वये व महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ चे कलम ८(४) अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०१७१०१८१४१६४०८०१० असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Sanjay Vithoba Kalbhor
Date: 2017.10.18 17:30:45 +05'30'

(संजय काळभोर)
कार्यासन अधिकारी

प्रत:-

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई (पत्राने)
२) मा. मुख्यमंत्री, यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.विरोधी पक्षनेता,महाराष्ट्र विधानसभा,अ-६, मंत्रालय समोर,नरिमन पॉईंट,मुंबई-४०० ०३२
५) मा.विरोधी पक्षनेता,महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई-४०० ०३२
६) मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई
८) प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
९) प्रधान सचिव, विधान मंडळ सचिवालय यांचे स्वीय सहायक विधानभवन मुंबई - ३२
१०) कामगार आयुक्त, कामगार भवन, सी-२०, ई-ब्लॉक, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
११) सह कामगार आयुक्त,कामगार भवन,सी-२०, ई-ब्लॉक,वांद्रे-कुर्ला संकुल,वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
१२) कामगार उप आयुक्त, कामगार भवन,सी-२०, ई-ब्लॉक,वांद्रे-कुर्ला संकुल,वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
१३) माहिती व जनसंपर्क संचालनालय मंत्रालय मुंबई-३२
१४) अध्यक्ष, सर्व सुरक्षा रक्षक / माथाडी मंडळे.
१५) सर्व कार्यासने, कामगार विभाग मंत्रालय मुंबई.
१६) निवडनस्ती (कामगार-५).